प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस
एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701
एक वेळ अवश्य भेट द्या 8459953702

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शनिवार २४ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ ले ● अंक ९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक मो.न.9422660077

# ज्येष्ठांच्या मोफत प्रवास योजनेत एस.टी.ने सरकारला गंडवले

## आता नफ्याची चौकशी

जुलै महिन्यात 31 विभागांपैकी 18 विभाग नफ्यामध्ये आले. त्यापैकी जालना (3.34कोटी), अकोला (3.14कोटी), धुळे (3.7 कोटी), परभणी (2.98 कोटी), जळगाव (2.40 कोटी), बुलडाणा (2.33 कोटी) या विभागांनी 2 कोटी पेक्षा जास्त नफा कमावला होता. या सर्वच विभागांना आता चौकशीला सामोरे जावे लागणार आहे.

मुंबई । प्रतिनिधी

ज्येष्ठ नागरिकांनी मोफत प्रवास केल्याचे प्रमाण वाढवून राज्य सरकारला गंडा घालण्याचा धक्कादायक प्रकार एस.टी. महामंडळाने केल्याचे उघड झाले आहे. ज्येष्ठांसाठीची जादा तिकिटे पंच करून एस.टी.च्या किती विभागांनी आपला नफा वाढवला आणि राज्य शासनाला गंडवले या चौकशीची चाके आता वेगाने फिरू लागली आहेत. ज्येष्ठांसाठीची जादा तिकिटे पंच करण्याचा पराक्रम करणारा जालना विभागातील परतूर आगाराचा एक वाहक तिरुपती महादेव केंद्रे निलंबित झाला आणि या घोटाळ्याला वाचा फुटली. जादा तिकिटे पंच करण्यात वाहकाला व्यक्तिगत लाभ नसला, तरी आपल्या विभागाचा नफा वाढवण्यासाठी एस.टी. च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच ही भलतीच योजना आखली आणि आता वरिष्ठांच्या सूचनेनुसार जादा तिकीट पंच करणारे वाहक मात्र या योजनेचे बळी ठरणार आहेत. 75 वर्ष पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना राज्य सरकारने 26 ऑगस्ट 2022 पासून एस.टी.चा प्रवास मोफत केला. या योजनेला सोमवारी दोन वर्षे पूर्ण होत असतानाच हा घोटाळा उघडकीस आला. हे विशेष! राज्य सरकारच्या 75 वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आणि महिलांना 50 टक्के सवलत या दोन योजनांमुळे एस.टी.



ची चांदी झाली आहे. या दोन्ही सवलतींचे सवलत मूल्य राज्य सरकारकडून महामंडळाला अदा केले जाते. मोफत प्रवास आणि 50 टक्के सवलत यामुळे एस.टी. ची प्रवासी संख्या झपाट्याने वाढली. दररोजची प्रवासी संख्या 55 लाखांच्या घरात पोहोचली. परिणामी, महामंडळाच्या महसुलातदेखील वाढ झाली. 30 सेकंदांत 27 तिकिटे महामंडळाने उत्पन्न वाढीसाठी आगारांमध्ये स्पर्धा लावली. त्यातूनच उत्पन्न वाढीसाठी ही भन्नाट आयडिया वाहतूक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लढविल्याचे महामंडळातील सूत्रांनी सांगितले. वाहकांच्या ताब्यात तिकिट मशिन देण्याआधीच पाच हजारांची 75 वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिकांची तिकिटे मारलेली असतात. राज्यातील एका आगारात तर 30 सेकंदांत 27 तिकिटे पंच झाली आहेत. सांगली-कोल्हापुरात वाहतूक बंद, तरीही तिकिटे काही दिवसांपूर्वी कोल्हापूर-सांगली परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे पूर आला होता. पुरामुळे या दोन्ही जिल्ह्यांतील एस.टी.च्या वाहतुकीला फटका बसला होता. वाहतूक बंद असतानादेखील अमृत ज्येष्ठ नागरिकांची तिकिटे काढली गेली आहेत. म्हणे, रोज 40 टक्के ज्येष्ठ प्रवास करतात 2021 गणतीनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या सुमारे 13 कोटी आहे. या लोकसंख्येमध्ये 75 वर्षे आणि त्या पुढील ज्येष्ठांची संख्या 2.4 टक्के म्हणजे सुमारे 31 लाख इतकी आहे. त्यापैकी एस.टी.तून दररोज सात ते आठ लाख अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवास करतात हा आकडा अवास्तव नाही, असा एस.टी. महामंडळाचा दावा राहिला आहे. मात्र, रोज 8 लाख ज्येष्ठ प्रवासी मोफत प्रवास करतात हे प्रमाण मानले तरी राज्यातील तब्बल 40 टक्के आजी-आजोबा रोज फक्त प्रवास करण्याचेच काम करतात, असा त्याचा अर्थ होतो.



# महाराष्ट्र विद्यालय मोहा च्या मुलीचा कबड्डी स्पर्धेत डंका

केज । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील महाराष्ट्र विद्यालय मोहा चे विद्यार्थी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्ध्येत विविध वयोगटात प्रथम क्रमांक मिळवला आहे. गुरूवार दि २३ रोजी परळी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा परळी शहरात आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालय मोहाचे विद्यार्थी १४, १७ व १९ वर्ष वयोगटात मुली यांनी क्रमांक पटकावला आहे . विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे क्रीडा शिक्षक सुनील तारे, सहकारी सुनील शिंदे आदींचे मार्गदर्शन लाभले. कु.किरण कुटे, कु.कावेरी गवळी, कु.पंकजा गवळी आणि कु.कीर्ती कुटे यांनी चमकदार कामगिरी करत आपआपल्या गटात चमकदार कामगिरी करत शाळेच्या संघाला तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून दिला. शाळेचे हे तिन्ही मुलींचे संघ जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत परळी तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

# पद्म पुरस्कार २०२५ साठी नामांकने सादर करण्याची अंतिम तारीख १५ सप्टेंबर २०२४

नवी दिल्ली, -

22 : दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा होत असते. ही प्रथा पुढे नेत यावर्षी ही पद्म पुरस्कारांची नामांकने, केंद्रीय गृह मंत्रालयाने सादर करण्याचे आवाहन केले आहे. याबाबत प्रक्रिया 1 मे 2024 पासून प्रारंभ झाली असून, नामांकने सादर करण्याची अंतिम तारीख 15 सप्टेंबर 2024 आहे. पद्म पुरस्कारांसाठीचे नामांकने (https://awards.gov.in). या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टवर ऑनलाईन सादर केली जातील पद्मविभूषण, पद्मभूषण, आणि पद्मश्री हे देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार




असून, कला, साहित्य, शिक्षण, क्रीडा, आरोग्य, सामाजिक कार्य, विज्ञान आणि अभियांत्रिकी, सार्वजनिक सेवा, नागरी सेवा, व्यापार, औद्योगिकी अशा विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी हे पुरस्कार दिले जातात. प्रत्येक भारतीय नागरिक, वंश, व्यवसाय, स्तर, किंवा लिंगाचा अपवाद न करता, या पुरस्कारांसाठी पात्र आहे. सरकार सर्व नागरिकांना स्वत:चे नामांकन करण्यासाठी आणि इतर योग्य व्यक्तींच्या शिफारसी सादर करण्याचे आवाहन करत आहे, विशेषत: स्त्रिया, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग, आणि निस्वार्थ सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या शोधासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नामांकने सादर करताना, व्यक्तीच्या उल्लेखनीय कार्याची माहिती 800 शब्दांपर्यंतच्या वर्णनात नमूद करणे आवश्यक असल्याचे गृह मंत्रालयाने त्यांच्या बातमी पत्रात म्हटले आहे. यासंबंधी अधिक माहिती गृहमंत्रालयाच्या (https://mha.gov.in) संकेतस्थळावर तसेच पद्म पुरस्काराच्या पोर्टलवर (https://padmaawards.gov.in) उपलब्ध आहे.

# परळी वैद्यनाथ कृषी महोत्सव : तिसऱ्या दिवशीही राज्यभरातील शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

परळी वैद्यनाथ येथे सुरू असलेल्या कृषी महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी आज देखील राज्यभरातून



शेतकऱ्यांनी उदंड प्रतिसाद दिला आहे. राज्यातील विविध जिल्ह्यातील हजारो शेतकरी याठिकाणी भेट देऊन कृषी प्रदर्शनाचा लाभ घेत आहेत. गडचिरोली, अमरावती, नागपूर, रत्नागिरी, रायगड ते अगदी कोल्हापूर पासून या प्रदर्शनास शेतकरी बांधवानी उदंड प्रतिसाद दिल्याचे पाहायला मिळत आहे. कृषी प्रदर्शनात उभारण्यात आलेल्या विविध कृषी उत्पादने व उमेद अभियानातील महिला बचत गटांच्या स्टॉल्स वर खरेदीसाठी पुरुषांसह महिलांची देखील मोठी गर्दी उसळल्याचे पाहायला मिळाले.

# धानोरा गटात पै.सतीश शिंदेंच्या जंगी स्वागताने आमदारकीचे शुभ संकेत!

## ढोल-ताशा गाजत वाजत, फुलांची उधळण करत जनतेकडून आबांचे स्वागत

आष्टी | प्रतिनिधी

जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे यांनी सध्या आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये गाव भेट दौरा सुरू केला असून या दौऱ्याला जनतेकडून उदंड प्रतिसाद मिळताना दिसत आहे बऱ्याच ठिकाणी गाजत वाजत फुलांची उधळण करत आतिश बाजी करत जनतेकडून सतीश शिंदे यांचे स्वागत केलं जात असून आमदारकीसाठी एक प्रकारे शुभ संकेतच मिळत असल्याचं चिन्ह दिसत आहे.



आष्टी तालुक्यातील धानोरा जिल्हा परिषद गटांमध्ये सध्या पै. सतीश आबा शिंदे यांचा गाव भेट दौरा सुरू आहे. या दौऱ्यामध्ये जनतेच्या अडीअडचणी जाणून घेत येणाऱ्या विधानसभा अनुषंगाने भेटीगाठी सर्वच नेत्यांच्या सुरू आहे परंतु पैलवान सतीश आबा शिंदे यांची गाव भेट म्हणजे आपुलकीची जिव्हाळ्याची आणि हक्काची आहे याच पद्धतीने जनतेकडूनही त्यांचं तितक्याच उत्साहाने स्वागत केले जात आहे. आज आष्टी तालुक्यातील धानोरा गट शिरापुर,चिंचोली,साबलखेड ,धानोरा,हिवरा,पिंपरखेड,सुलेमान देवळा ,दादेगाव,डोंगरगण,देविनिमगांव, येथील नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला व त्यांच्या विविध अडीअडचणी समस्या समजून घेतल्या आणि सोडवण्याचा प्रयत्न करू तसेच येणाऱ्या प्रत्येक अडचणी ह्या माझ्या अडचणी समजून तुमचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याची जबाबदारी येणाऱ्या काळात माझ्यावर यावी हीच अपेक्षा व्यक्त केली.

### दौरा गाव भेटीचा ; शुभ संकेत आमदारकीचे!

आष्टी मतदार संघातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आज पर्यंत जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे नेहमीच खंबीरपणे उभे राहिले असून सध्या गाव भेट दौऱ्याच्या माध्यमातून जनतेच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी आणि भविष्यातील दिशा काय असावी काय असेल याचं हितगुज करण्यासाठी संवाद दौरा सुरू आहे यामध्ये पै.सतीश शिंदे यांना आमदारकीसाठी शुभ संकेत मिळत असल्याचे सुद्धा दिसत आहे..

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी संजय तोडकर यांची निवड



**केज । सचिन भालेराव**
केज तालुक्यातील मांगवडगाव येथील सरपंच तथा युवा कार्यकर्ते संजय तोडकर यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी संजय तोडकर यांची निवड करण्यात आली आहे. तोडकर यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.बबनराव तायवाडे, राष्ट्रीय सचिव सचिन राजूरकर, व महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष श्री. प्रकाश भगिरथ,व मराठवाडा अध्यक्ष पै.दिपक जाधव यांनी संजय तोडकर यांची बीड जिल्हयाचे जिल्हाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. याबाबत निवडीचे नियुक्ती पत्र संजय तोडकर यांना मुंबई येथे प्रदान करण्यात आले आहे. केज तालुक्यातील मांगवडगावं येथील सरपंच संजय तोडकर हे गेल्या २०वर्षापासून सक्रिय राजकारणात सतत कर्यरत आहेत. राजकीय आणि सामाजिक कार्यात देखील सतत अग्रेसर असणारे व्यक्तिमत्व श्री संजय गोपीनाथ तोडकर यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.बीड जिल्ह्यातील केज-धारूर -अंबाजोगाई -परळी या चार तालुक्याचे कार्यक्षेत्र त्यांच्याकडे असणार आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष पै.दिपक जाधव यांच्या हस्ते मुंबई येथे हे नियुक्ती पत्र देण्यात आले आहे,बीड जिल्ह्यातील ओबीसी समाजाच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचे कार्य करावे तसेच संघटना वाढीसाठी प्रयत्न करावेत असेही नियुक्ती पत्राद्वारे म्हटले आहे. यावेळी मराठवाडा अध्यक्ष पै.दिपक जाधव यांच्या हस्ते हे नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी.या वेळी धाराशिवचे जिल्हाध्यक्ष जोतिराम कोरे,जिल्हा सरचिटणीस सतिष वैद्य व तालुकाध्यक्ष शंकर कराड आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती धनेगाव मध्ये साजरी

**धनेगाव /सचिन भालेराव**
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती धनेगांव ता-केज जि-बीड येथे मोठ्या उत्साहात साजरी केली यावेळी ध्वजारोहण करण्यात आले, प्रमुख उपस्थिती माजी सरपंच सुहास गुजर, किशोर थोरात, सरपंच विवेक खोडसे, चेअरमन लक्ष्मण सोनवणे, शंकर इंगळे, डॉ उत्तम गोडसे, पत्रकार दत्ता मुजमुले, ॲड राणा सोनवणे व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती चे अध्यक्ष सौरव सोनवणे व लहुजी ग्रुप उपस्थित होता. सायंकाळी भव्य मिरवणूक




वाजत गाजत काढण्यात आली यावेळी महिला भगिनी तसेच समाजबांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तसेच युसुफ वडगाव पोलीस स्टेशन चे बीट अंमलदार डोंगरे साहेब, भोसले साहेब यांनी सहकार्य केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष सौरव सोनवणे, उपाध्यक्ष रवि सोनवणे, सचिव दिपक सोनवणे, आकाश शिंदे, तानाजी लोंढे, चंद्रकांत शिंदे,अक्षय सोनवणे, रोहित सोनवणे,समाधान आटवे,बाळु रसाळ, ओमकार सोनवणे, युवराज रसाळ,सनि शिंदे, अजय सोनवणे,बाळू ढगे, ओमराज लोंढे, रवी जाधव, विकास सोनवणे,तुषार सोनवणे, किशोर जाधव,अविनाश आटवे, तुळशीराम वैरागे, अमर वैरागे,अमोल सोनवणे, जय ससाणे,मयूर कसबे,गणेश सोनवणे,आदित्य सोनवणे, रोहन सोनवणे.

## कुलगुरुंच्या दालनासमोर अ,भा,वी प चे ठिय्या आंदोलन

छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ विजय फुलारी यांच्या दालनासमोर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करीत दोन तास आंदोलन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उत्कर्ष कॅम्पमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी कर्मचाऱ्याकडून फोन करून अपशब्द वापरल्याचा आरोप संघटनेने करीत संबंधितावर कायदेशीर कारवाई ची मागणी केली अभावीपणे प्रशासकीय इमारतीसमोर घोषणा दिल्या नंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कुलगुरू दालनासमोर ठिय्या आंदोलन केले या प्रकरणात तत्काळ दखल न घेतल्यास कुलगुरूंच्या विरोधात राज्यभरात आंदोलने केले जाईल कुलगुरूंना राजीनामा देण्यास भाग पाडले जाईल असा इशाराही यावेळेस देण्यात आला त्यानंतर कुलगुरू डॉक्टर फुलारी कुलगुरू डॉक्टर वाल्मीक सर्वदे कुलसचिव डॉक्टर प्रशांत अमृतकर यांनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना दालनात बोलावून घेत संवाद साधला यावेळी अ भा वी प च्या प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे यांच्यासह इतरांची उपस्थिती होती, विद्यापीठाची भूमिकाकुलसचिव डॉक्टर प्रशांत अमृतकर यांनी सांगितले की सलग्न महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी मे च्या शेवटी तक्रार केली हे प्रकरण विशाखा समितीकडे वर्ग केले समितीने संबंधिताचा जबाब घेऊन ते निकाली काढले तरीही आरोपी व्हाट्सएपच्या माध्यमातून व्हिडिओ कॉल,मेसेज करून अश्लील बोलताना आढळून आला,त्यामुळे तक्रार दाखल करण्यात आले तरी तक्रारदारांचे समाधान झाले नसल्यास सायबर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास सांगितले संघटनेने केलेल्या मागणीनुसार त्या कर्मचाऱ्यास नोकरीतून काढले

# बदलापूरच्या शाळेमध्ये झालेल्या लैंगिक अत्याचाराची तक्रार शाळेने पोलिसात न दिल्याने शाळेवर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल.

नाशिक । सुरेश इंगळे
ठाणे जिल्ह्यातील बदलापूर शहरांमध्ये चिमुकलींवर झालेल्या लैंगिक अत्याचारामुळे संपूर्ण महाराष्ट्र संतापलेला असताना, आरोपीला २६ ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे, याप्रकरणी न्यायालयाने असे सांगितले की, चार वर्षाच्या मुलीवर अत्याचार होतो आहे, ही कसली परिस्थिती आहे? शाळेतच मुली सुरक्षित नसतील, शाळा सुरक्षित नसेल, तर इतर गोष्टीवर बोलण्यात काय अर्थ? अशी संतप्त प्रक्रिया न्यायालयाने दिली आहे. ज्यावेळी लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती पालकांनी शाळेतील अधिकाऱ्यांना दिली, त्यावेळी शाळेनी सुद्धा याबाबतची तक्रार पोलिसात देणे अनिवार्य होती, परंतु शाळेने मात्र तसे काही केले नाही. उलट हे प्रकरण लपवण्याचा प्रयत्न शाळेकडून करण्यात आला. शाळेने ही तक्रार पोलिसात न दिल्याने त्या शाळेवर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशा प्रकारे एखाद्या




शाळेवर पोस्को गुन्हा दाखल झाल्याची ही पहिलीच वेळ आहे. १२ आणि १३ ऑगस्टला आरोपी अक्षय शिंदे यांनी दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार केला होता, २१ ऑगस्ट रोजी न्यायालयात या प्रकरणी दखल घेण्यात आली, व २६ ऑगस्ट पर्यंत आरोपीला पोलीस कोठडी दिली असून २७ ऑगस्टला पुढील सुनावणी होणार आहे. कोर्टाने केलेल्या सुनावणीमध्ये सरकारकडून केस लढणाऱ्या वकिलाला काही प्रश्न विचारण्यात आले होते, त्यात मुलीवर झालेल्या अत्याचाराची तक्रार शाळा प्रशासनाकडे केली होती का? असा सवाल सरकारकडून केस लढवणाऱ्या वकिलांना करण्यात आला. त्यावर वकिलांनी हो असं उत्तर दिलं. त्यानंतर शाळेने दखल न घेता प्रकरण लपवलं त्या प्रकरणी शाळेवर गुन्हा दाखल झाला का ?असा सुद्धा सवाल कोर्टाकडून करण्यात आला होता. त्यानंतर आता शाळेवर गुन्हा दाखल झाला असून न्यायालयाने पोलिसांना सवाल करत पालकांनी एफ आय आर दाखल केल्यानंतर शाळा प्रशासनावर गुन्हा दाखल का केला नाही याबाबत पोलीस प्रशासनाला चांगलाच फटकार दिला आहे.

## नेपाळ बस दुर्घटना: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा केंद्रीय गृहमंत्र्यांशी संवाद

## वायुसेनेच्या विमानाने शनिवारी मृतदेह महाराष्ट्रात आणणार समन्वयासाठी नोडल अधिकारी नियुक्त

**मुंबई । प्रतिनिधी**
नेपाळमध्ये झालेल्या बस दुर्घटनेत जळगाव जिल्ह्यातील २४ जणांच्या मृत्यू प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त करीत कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केली आहे. याअपघातातील मृतदेह तातडीने महाराष्ट्रात आणण्यासाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. याप्रकरणी केंद्राकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांनी मुख्यमंत्र्यांना दिले होते. मुख्यमंत्र्यांच्या विनंतीला तात्काळ प्रतिसाद देत वायुसेनेच्या विमानाने उद्या शनिवारी २४ जणांचे मृतदेह नाशिक येथे आणण्यात येणार आहेत. तेथून कुटुंबियांकडे ते पोहोचविण्यात येणार आहेत. जळगाव जिल्ह्यातील भाविकांच्या बसला नेपाळमध्ये दुर्घटना झाल्याने २४ जणांचा मृत्यू झाल्याची बातमी कळताच मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी राज्यातील मदत व पुनर्वसन विभागातील अधिकारी, केंद्रीय अधिकारी यांच्याशी सातत्याने संवाद साधत मदतीच्या कामाची माहिती घेतली. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांच्याशी संवाद साधून भाविकांचे मृतदेह महाराष्ट्रात तातडीने आणण्याकरिता विनंती केली होती. याप्रकरणी राज्याला सर्वतोपरी मदत करू. त्यासाठी समन्वयासाठी विशेष अधिकारी नियुक्त केल्याचेही केंद्रीय गृहमंत्र्यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांना सांगितले. दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या मागणीला तात्काळ प्रतिसाद वायुसेनेचे विशेष विमान मृतदेह आणण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उद्या हे मृतदेह नेपाळवरून उत्तर प्रदेशातील गोरखपुर येथे आणण्यात येतील. तेथून वायुसेनेच्या विमानाने नाशिक येथे ते आणले जातील. त्यानंतर कुटुंबियांकडे मृतदेह सोपविण्यात येणार आहेत.

## जीवाची वाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

येवता । प्रतिनिधी केज तालुक्यातील जीवाची वाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह,ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व काकडा भजन दैनंदिन कार्यक्रम कार्यक्रम पुढील प्रमाणे आरंभ दि. २०/०८/२०२४ ते २७/०८/२०२४ किर्तनरूपी सेवा रात्री ०९ ते ११ वा.पुढील प्रमाणे मंगळवार ह.भ.प.श्री. बालाजी महाराज मुंडे. बुधवार ह.भ.प.श्री.केशव महाराज घुले,शास्त्री. गुरुवार ह.भ.प.श्री.संतोष महाराज वनवे. शुक्रवार ह.भ.प.श्री.आप्पासाहेबमहाराजचौरे.शनिवारह.भ.प.श्री. व्याकरणाचार्य अर्जुनजी महाराज लाड(गुरुजी) सोमवार ह.भ.प.श्री.विठ्ठल महाराज चौरे(पंढरपूर ) मंगळवार दि.२७ रोजी सकाळी ०९ ते ११ वा.ह.भ.प.श्री. बालयोगी हरिहर महाराज (दिवेगावकर)यांचे अमृतुल्य काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसाद होईल. आयोजक:ग्रामस्थ जीवाचीवाडी

# शिवसैनिकांनो, बीड विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी दंड थोपटून मैदानात उतरा- बाप्पुसाहेब मोरे

## शिवसेना कार्यालयात जिल्हा आढावा बैठक संपन्न

परळी वैद्यनाथ (दि.22) - राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात प्रथमच परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सव अंतर्गत भरवण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उद्घाटन समारंभ संपल्यानंतर भेट देऊन पाहणी केली. कृषी क्षेत्रात लागलेले नवनवीन शोध, नवनवीन तंत्रज्ञान, नवीन आधुनिक अवजारे यांसह विविध शेती उत्पादने आदींची शेकडो दालने (स्टॉल्स) उभारण्यात आली असून नॅनो खतांची ड्रोन द्वारे फवारणी करण्याची प्रात्यक्षिके सुद्धा येथे दाखवण्यात येत आहेत. या स्टॉल्सला भेटी देण्यामध्ये कृषिमंत्री धनंजय मुंडे हे तब्बल साडेतीन तास रमले होते. जवळपास 7.30 ते 11 वाजेपर्यंत या वेळेत त्यांनी जवळपास 335 स्टॉल्सला



भेटी देऊन पाहणी केली व त्यांच्याकडील उत्पादनांची व तंत्रज्ञानाची माहिती घेतली. चारही कृषी विद्यापीठाचे स्टॉल्स या ठिकाणी उभारले असून, तेथील उपक्रमांचीही मुंडेंनी माहिती घेतली. या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या स्टॉल्समध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्यासाठी आणि शेतीमध्ये अधिक समृद्धी आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक बाबी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी व लाभ मिळवावा, असे आवाहन याप्रसंगी धनंजय मुंडे यांनी केले आहे. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक श्री.मुळे, आत्माचे जिल्हा प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांसह अधिकाऱ्यांनी श्री मुंडे यांना माहिती दिली. प्रसंगी पदाधिकारी व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली, त्यालाही शेतकरी बांधवांचा मोठा प्रतिसाद लाभला. हा उपक्रम पुढील चारही दिवस अविरत सुरू राहणार आहे.

# विनापरवाना झाड तोडल्यास ५० हजारांचा दंड, नियमांची कठोर अंमलबजावणी होणार का?? नियम कागदावरच; जिल्ह्यात सर्रास वृक्षतोड,वनविभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष :- डॉ.गणेश ढवळे

**बीड : प्रतिनिधी**

बीड:- (दि.२३) संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ टक्के इतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे. वनक्षेत्र कमी असल्याने बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट ओढावत आहे.वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी शासनाकडून "झाडे लावा झाडे जगवा" म्हणत कोट्यवधींचा खर्च करण्यात येतो मात्र वृक्षलागवड कागदोपत्रीच दिसून येते. दि.१२ जुलै अर्थसंकल्प २०२४-२५ दरम्यान लक्ष्यवेधी प्रश्नाला उत्तर देताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार




यांनी महाराष्ट्र वृक्षतोड ( नियमन) अधिनियम १९६४ मधील कलम ४ मध्ये दुरुस्ती करून विना परवाना वृक्षतोड प्रकरणात सुरूवातीला १००० रुपये दंडाची रक्कम वाढवून ५० हजार रुपये दंडाची रक्कम आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निसर्गाचा -हास थांबविण्यासाठी वृक्षतोडीला पुर्णविराम मिळावा यासाठी वनविभागाकडुन कठोर कारवाई करणं आवश्यक आहे तसेच वृक्षतोड करून अवैध वाहतूक केल्यास १९२७ चे कलम ४२ नुसार सदर वाहन व साहित्य जप्त करून १ वर्ष कारावास किंवा ५००० रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे मात्र वनविभागाचे वृक्षतोडीकडे दुर्लक्ष होत असुन जिल्हा प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणं गरजेचं असुन नियम केवळ कागदावरच राहु नयेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे. रस्तारूंदीकरणाच्या नावाखाली बेसुमार वृक्षतोड; पुनर्वसनच नाहीच बीड जिल्ह्यातील धुळे -सोलापुर, अहमदपूर ते अहमदनगर, अथवा बीड ते अहमदनगर आदि राष्ट्रीय महामार्गाचे रूंदीकरण कामासाठी ५०-६० वर्षांपूर्वीचे महाकाय वड ,वड,पिंपळ,लिंब,चिंच या वृक्षांची बेसुमार वृक्षतोड करण्यात आली मात्र त्याबदल्यात नियमानुसार ५ पट वृक्षलागवड अथवा वृक्षांचे पुनर्वसन करण्यात आलेच नाही. बीड शहरातील नगर रोडवरील शासकीय कार्यालय ईमारत बांधकामासाठी आवारातील मोठमोठे वृक्ष तोडण्यात आले आहेत. त्या बदल्यात वृक्षलागवडीची कोणतीही उपाययोजना जाहीर करण्यात आली नाही.

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना पंडित दिनदयाळ स्वयंम योजनेस मुदतवाढ

बीड, दि. 23 :जिल्हयातील इतर मागास वर्गीय( ओबीसी) विमाप्र (एसबीसी) व विजाभज (व्हीजेएनटी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ स्वयंम योजना ( भटक्या जमाती क-प्रवर्गासाठी ) या अर्ज सादर करण्याची मुदत हद. 31 जुलै पर्यंत देण्यात आली होती तथापी सदर योजनांना मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता या दोन्ही योजनांना दि. 30 ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी विद्यार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा व अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे संचालक एस.एन. मेश्राम यांनी केले आहे.

## शहरातील मोकाट जनावराचा बंदोबस्त करा नसता सर्व जनावरे नगरपालिकेत कोंडू

### माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील निर्भिड पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, राजकीय विश्लेषक सुरेश म्हेत्रे यांची राष्ट्रीय फुले ब्रिगेड अहमदनगर जिल्हा मीडिया प्रभारी पदी निवड करण्यात आली असून राष्ट्रीय फुले ब्रिगेड चे प्रदेशाध्यक्ष प्रवीण बनसोडे, प्रदेश प्रभारी अमोल बारवकर, केंद्रीय कोअर कमिटी सदस्य विनोद माळी, राष्ट्रीय फुले ब्रिगेड मीडिया प्रभारी महाराष्ट्र राज्य सागर जैवाळ यांचे हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.सामाजिक जीवनात कार्य करत असताना विविध कार्यात नेहमी अग्रेसर असणारे तसेच राजकीय विश्लेषण अगदी तंतोतंत करणारे, आपले मत परखड मांडणारे असे सुरेश म्हेत्रे सर यांची राष्ट्रीय फुले ब्रिगेड



अहमदनगर जिल्हा मीडिया प्रभारी पदी निवड करण्यात येत आहे त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा असे प्रतिपादन सागर जैवाळ राष्ट्रीय फुले ब्रिगेड मीडिया प्रभारी महाराष्ट्र राज्य यांनी व्यक्त केले. निवडीबाबत बोलताना सुरेश म्हेत्रे म्हणाले की राष्ट्रीय फुले ब्रिगेड चे अहमदनगर जिल्हा मध्ये प्रचार, प्रसार तसेच समाज हिताचे काम करण्यास नक्कीच अग्रेसर राहील तसेच राष्ट्रीय फुले ब्रिगेड चे विचार समाजाच्या तळागाळपर्यंत पोहचवनार असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. निवड झाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# रॅगिंग प्रतिबंधक कायद्याची जनजागृती

**बीड** बीड, दि. 23 : विद्यार्थ्यांनी शैक्षणिक संकुलात आपले भविष्य घडवण्यासाठी यावे कोणाचे आयुष्य बिघडवण्यासाठी नाही. विद्यार्थ्यांनी त्यांच्या हुशारीचा, त्यांच्या ताकतीचा, संपत्तीचा उपयोग वंचित मानसांना बळ देण्यासाठी करावा, असे अवाहन रॅगिंग प्रतिबंधक कायद्याची जनजागृती अंतर्गत कार्यक्रमात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. जी. सोनी यांनी केले. किमान समान कार्यक्रमाअंतर्गत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीडचे आनंद एल. यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली "रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम 1999" या विषयी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री सोनी बोलत होते.

सदर कार्यक्रमात महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम 1999 या विषयावर बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. जी. सोनी यांनी उपस्थित विद्यार्थ्याना कायदयाविषयी माहितीही दिली. सदरील कार्यक्रमात बालकल्याण समिती, बीडचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम 1999 या कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना सांगितले की, शैक्षणिक संस्था या आपले आयुष्य घडवण्यासाठी असतात. या संस्थेमध्ये येऊन सर्व विद्यार्थ्यांनी ज्ञानअर्जन करण्याचे काम करावे असे अपेक्षित आहे. पण काही वर्षापूर्वी उच्च शिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणात रॅगिंग वाढल्यामुळे महाराष्ट्र शासनाला हा कायदा करावा लागला. या कायद्याच्या कचाट्यात कोणी सापडले तर दोन वर्षाचा कारावास व पाच वर्ष कोठेही शैक्षणिक संस्थेत प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांनी रॅगिंग करू नये, असे अवाहन अशोक तांगडे यांनी केले.

तसेच शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य एम.आर. लोहोकरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर कार्यक्रमाचे संचालन संगणक विभागाचे प्रमुख एस.बी. वीर यांनी केले. सदर कार्यक्रमाला शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.



# बीड-नाथापूर रस्त्यावर अपघात; एक ठार

बीड : बीड-नाथापूर रोडवरील उमरी फाटा या ठिकाणी दोन मोटारसायकलचा समोरासमोर अपघात होऊन एकजण जागीच ठार झाल्याची घटना दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली. यामध्ये दुसरा मोटारसायकलस्वार घटनास्थळावरून पळून गेल्याचे समजते.बीड-नाथापूर रस्त्यावर दुपारी दीडच्या सुमारास लक्ष्मण मस्के रा.राक्षसभुवन हे मोटारसायकलवर जात असताना दुसऱ्या बाजूने आलेल्या भरधाव मोटारसायकलची समोरा समोर जोरदार धडक झाली. यामध्ये लक्ष्मण मस्के यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुसरा मोटारसायकलस्वार हा घटनास्थळावरून पळून गेला. येणाऱ्या जाणाऱ्या लोकांनी लक्ष्मण मस्के यांना रूग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला.मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

# शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावेत

**बीड प्रतिनिधी):-**

, दि. 23 :शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करुन द्यावे. जिल्हयामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची वर्ष 2021- 2022 या वर्षापासून शिष्यवृत्ती रक्कम महाविद्यालयास प्राप्त न झाल्याने महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे देण्यास नकार दिल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची शिक्षण फी वसूल करण्यात येऊ नये , तसे आढळल्यास संबंधित महाविद्यालया विरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सूचना जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना वारंवार बैठकीमध्ये व पत्र व्यवहाराद्वारे कळविण्यात आले आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांबाबत शासन निर्णयान्वये वर्ष 2021-2022 ते वर्ष 2025-2026 या कालावधीसाठी शिष्यवृत्तीच्या एकूण रकमेच्या 60 टक्के रक्कम विद्यार्थ्याच्या खात्यावर व 40 टक्के रक्कम संबंधीत महाविद्यालयाच्या बँक खात्यावर जमा करण्याचा तसेच विद्यार्थ्यांचे बँक खात्यावर जमा झालेली रक्कम निर्वाह भत्ता वजा जाता महाविद्यालयास देय असलेली रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांनी 7 दिवसाचे आत महाविद्यालयास हमीपत्र घेऊन जमा करणे बाबत निर्णय शासनाने घेता आहे.

सन 2021-2022 पासून केंद्र शासनाने केंद्र हिश्याच्या 60 टक्के सुधारित केलेल्या शिष्यवृत्तीच्या वितरण पध्दती विरुध्द राज्यातील महाविद्यालयांनी मोठया प्रमाणात विरोध दर्शविला असून मा.उच्च न्यालयाय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेल्या आहेत. सद्यस्थितीत याचिका न्यायप्रविष्ठ आहेत. सन 2021-2022, 2022-23 व 2023-24 या कालावधीतील केंद्र हिश्याच्या 60 टक्के शिष्यवृत्ती रक्कमेबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय, परिपत्रके व वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार जिल्हास्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच याबाबत

जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना यापूर्वीच आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तरीही बीड जिल्हयातील काही महाविद्यालये शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शुल्क भरण्यासाठी सतत तगादा लावत असलेबाबत तसेच विद्यार्थ्याची कागदपत्रे, प्रमाणपत्रे,टि. सी. देण्यास अडवणुक करित असल्याची बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली आहे.

शैक्षणिक कागदपत्रांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक किंवा आर्थिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयावर निश्चित करण्यात येणार आहे. तसेच त्या महाविद्यालयांबाबत मागासवर्गीय विद्यार्थ्याच्या कागदपत्रांची अडवणुक केल्याची तक्रार प्राप्त झाल्यास अशा महाविद्यालयाविरुध्द शासन निर्णय क्रमांक-इबीसी-2003/ प्र.क्र.301/मावक-02मंत्रालय, मुंबई दिनांक 01 नोव्हेंबर,2003 अन्वये कार्यवाही करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.तरी सर्व महाविद्यालयांनी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे कोणत्याही प्रकारची अडवणूक न करता तात्काळ विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड यांनी केले आहे.

# भटकत्या आत्म्याचा मोदींना धसका, इलेक्शन जवळ आलं तरी:. रोहित पवारांचा हल्लाबोल



लोकसभा निवडणुकीदरम्यान राज्यात सभांवर सभा घेत महाराष्ट्र पिंजून काढल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विरोधकांनी कडाडून टीका केली होती. मात्र आता आगामी विधआनसभा निवडणुका अवघ्या काही महिन्यावर आलेल्या असतानाही अजून त्यांची महाराष्ट्रात एकही व्हिजिट झालेली नाही. त्यावरूनही आता महाविकास आघाडीतील नेत्यांनी पंतप्रधानांवर शरसंधान सोडलं आहे. ‘ ( भटकता) आत्मा असा ज्यांचा उल्लेख केला, त्यांचाच मदी साहेबांनी इतका धसका घेतला आहे की इलेक्शन दोन महिन्यांवर येऊनही त्यांची महाराष्ट्रात एकही व्हिजिट झाली नाही ‘ असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी मोदींना टोला लगावला आहे. मोदी हे महाराष्ट्रात येण्यास टाळाटाळ करत असल्याचा दावा त्यांनी केला. काय म्हणाले रोहित पवार ?

आत्म्याचा मोदी साहेबांनी इतका धसका घेतला की इलेक्शन दोन महिन्यांवर असून देखील एक सुध्दा व्हिजिट त्यांची महाराष्ट्रात झाली नाही. नाहीतर कस असतंय दुसऱ्या राज्यांमध्ये इलेक्शन सुरू होतं, त्याआधी ते महिन्यापूर्वीच यायला सुरुवात करतात आणि नारळ फोडून खोटं आश्वासन द्यायला सुरू करतात, अशी टीका त्यांनी केली.विधआसभा निवडणुकांची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही, त्यावरूनही रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली. ‘ विधानसभेचे इलेक्शन आता व्हायला पाहिजे होते, काय विरोधाभास आहे ते बघा मोदीसाहेब दिल्लीला लाल किल्ल्यावर काय बोलले अख्ख्या देशात एकदाच इलेक्शन झाले पाहिजे लोकसभेबरोबर’ ‘ ठीक आहे, मान्य करतो. मग जेव्हा महाराष्ट्राच्या इलेक्शनची गोष्ट येते, तेव्हा तुम्ही जम्मू काश्मीरचं इलेक्शन घेता,हरियानाचं इलेक्शन घेता आणि महाराष्ट्राचं इलेक्शन का बाजूला ठेवता? घाबरलात का?’ असा खडा सवाल त्यांनी विचारला. ‘ म्हणून तर सांगतो हे सरकार घाबरलेलं आहे, कुणाला घाबरलंय आम्हाला नाही, हे सरकार मतदारांला तुम्हाला घाबरलंय ‘ असंही रोहित पवार यांनी नमूद केलं.

मोदींनी शरद पवारांवर काय टीका केली होती ?

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभे दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांचं नाव न घेता खोचक टीका करत त्यांचा उल्लेख भटकता आत्मा असा केला होता. ‘ महाराष्ट्रात गेल्या 45 वर्षांपासून राज्यात वारंवार राजकीय अस्थिरता निर्माण झाली त्यापाठीमागे शरद पवार असल्याची टीका नरेंद्र मोदींनी केली. काही भटकत्या आत्म्यांमुळे महाराष्ट्रातील अनेक मुख्यमंत्र्यांना त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही’ , अशी टीका नरेंद्र मोदी यांनी नाव न घेता केली होती. महाराष्ट्राने खूप काळ राजकीय अस्थिरता पाहिली आहे. मी आज काही सांगण्याआधी स्पष्ट करु इच्छितो की, कुणीही आपल्या डोक्यावर टोपी घेऊ नका. आमच्याइकडे म्हणतात की, काही भटकणाऱ्या आत्मा असतात, ज्यांच्या इच्छा पूर्ण होत नाहीत, ज्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले असतात, अशा आत्मा भटकत असतात. मग स्वत:चं काम झालं नाही तर इतरांचं काम बिघडवण्यातही त्यांना मजा येते. आमचा महाराष्ट्रही अशा भटकत्या आत्म्यांचा शिकार झालाय”, अशी टीका नरेंद्र मोदींनी केली.

## अंशकालीन निदेशकांची विभागीय बैठक २५ ऑगस्ट रोजी जालन्यात

**जालना । प्रतिनिधी**

न्यायालयात गेल्याने नियुक्ती मिळालेले, न्यायालयात जाऊन सुद्धा अजून नियुक्ती न मिळालेले व अद्यापही न्यायालयात न गेलेले अशा सर्व कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन निदेशकांची महत्त्वपूर्ण विभागीय बैठक रविवार दिनांक 25 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी ठीक 11 वाजता जालना सिटी लॉन्स, कलश सीड्स कंपनी समोर, मंठा चौफुली, जालना येथे आयोजित केलेली आहे. या बैठकीस जालना, संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी यासह बुलढाणा, जळगाव, गोंदिया व इतर जिल्ह्यातील अंशकालीन निदेशक उपस्थित राहणार आहेत. सदर बैठकीत राज्यातील सर्व निदेशकांना नेमणूक मिळणे, तसेच नियुक्ती मिळालेल्या अंशकालीन निदेशकांना कायम करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करून संघटनेच्या माध्यमातून पुढील कार्यक्रमाची दिशा व नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त निदेशकांनी या बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन दीपक पवार, के.एम. खान, राजेंद्र गव्हाड, भागवत शिंदे, छाया देशमुख, कांचन वाघ आदींनी केले आहे.

## लाडकी बहीण योजना किती दिवस सुरु राहणार? देवेंद्र फडणवीस यांच्याकडून महिलांना खूशखबर

महायुतीचा नाशिकमध्ये कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात भाषण करताना देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील महिलांना खूशखबर दिली. राज्य सरकारकडून अडीच लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना दर महिन्याला 1500 रुपये आर्थिक मदत मिळणार आहे. याच योजनेबाबत देवेंद्र फडणवीस यांनी महिलांना उद्देशून महत्त्वाची माहिती दिली. लाडकी बहीण योजना किती दिवस सुरु राहणार याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली.

“आपण लाडकी बहीण योजना जेव्हा घोषित केली तेव्हा विरोधक म्हणायचे, फसवी योजना आहे. 10 टक्के महिलांनाही पैसे मिळणार नाही. मला सांगताना आनंद होतोय, पहिल्यात महिन्यात 1 कोटी पेक्षा जास्त महिलांच्या बँक खात्यात पैसे पोहोचले आणि उर्वरित सगळ्या महिलांच्या खात्यात पैसे जाणार, एकही बहीण वंचित राहू देणार नाही. सगळ्या बहिणींच्या खात्यात पैसे जाणार. दर महिन्याला आणि वर्षानुवर्षे महिलांच्या बँक खात्यात पैसे जाणार. तुमचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे तोपर्यंत ही योजना कुणीच बंद करु शकत नाही”, अशी महत्त्वाची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

विरोधकांच्या पोटात गोळा उठलाय’

“आमच्या विरोधकांच्या पोटात इतका गोळा उठलाय. ते म्हणतात, 1500 रुपये देवून तुम्ही त्या ठिकाणी महिलांना खरेदी करता का, महिलांना लाच देता का? अरे वेड्यांनो बहिणीचं आणि आईचं प्रेम कुणीच खरेदी करु शकला नाही. प्रत्यक्ष इश्वरदेखील उतरला आणि म्हटलं बहिणीचं प्रेम खरेदी करतो, पण ते खरेदी करता येत नाही. हे अनमोल प्रेम आहे”, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

“आमच्या बहिणींचं प्रेम मिळतंच, आमचा प्रयत्न आहे, त्या बहिणींना आम्ही ओवाळणी द्यावी तरी त्या प्रेमामध्येच राहायचं आहे. जे लोकं सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले त्यांना 1500 रुपयांचा मोल समजणार नाही. माझी जी मायमाऊली महिन्याचा हिशोब करताकरता तिच्या डोळ्यांतून पाणी येते त्या मायमाऊलीसाठी ही योजना आणली आहे”, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## श्री औदुंबर सुधीर मोरे माजीसहाय्याक अभियंता यांची उमरगा येथे बदली झाली असता निरोप समारंभ संपन्न



**( गेवराई प्रतिनिधी** ) श्री औदुंबर सुधीर मोरे माजी सहाय्यक अभियंता मादळमोही शाखा आणि अतिरिक्त कारभार पाडळसिंगी शाखा गेवराई उपविभाग बीड कार्यकाळ सन 2021 ते 20 24 ऑगस्ट पर्यंत एकनिष्ठ कार्य केले असता त्यांची बदली झाल्यावर सर्व पाडळसिंगी सब स्टेशन ची टीम मोरे साहेबांना निरोप देताना भावनिक झाले लाईट ऑफिसला शेतकऱ्याचा कार्यक्रम आयोजित केला असता लाईट ऑफिस अंतर्गत काम करणारे लाईनमन सर्व कर्मचारी स्टॉप हजर होते माध्यमाची बोलताना लाईनमन घाडगे साहेब म्हणाले की श्री औदुंबर सुधीर मोरे साहेबांनी सर्व कर्मचारी बरोबर मिळून मिसळून असे कार्य केले की त्यांना निरोप देताना सर्व सहकारी स्टॉप भावनिक झाले होते व त्यांच्या कार्यकाळातील गेलेले दिवस सदैव आठवणीत राहतील असे श्री घाडगे साहेब म्हणाले यावेळी निरोप देताना अतिरिक्त कार्यकारी अभियंता गेवराई श्याम मोरे सहाय्यक अभियंता शिवरत्न पंडित गेवराई व मादळमोही पाडळसिंगी तील कर्मचारी स्टॉप श्री एल एस जाधव तेजस शेळके दत्ता किवणे राजीव घाडगे गणेश गायकवाड हजारे साहेब विलास चव्हाण राजेश कुलकर्णी आकाश गोरड अशोक झंझुरने गणेश आटपळे ज्ञानेश्वर यादव नितीन गायकवाड अमोल शिंदे ज्ञानेश्वर वखरे व सर्व यावेळी उपस्थित होता तेव्हा या निरोप समारंभाला संबोधित करताना श्री औदुंबर मोरे असे म्हणाले की मी शरीराने उमरगा येथे राहील परंतु माझे सर्व चित्त आपल्या पाडळसिंगी मादळमोही येथे राहील मला पाडसिंगी मादळमोही या ठिकाणी जाऊ वाटत नाही परंतु साहेबाच्या विनंतीला मान देऊन मीही बदली उमरगा शहरी विभागामध्ये जात आहे तेव्हा मला गेवराई तालुक्याची आठवण वेळोवेळी येईल यावेळी या सत्कार कार्यक्रमाला आलेल्या सर्व मान्यवरांचे कर्मचारी वर्गांचे आभार ज्ञानेश्वर यांनी मानले व कार्यक्रम संपला असे जाहीर केले

## संपादक ज्ञानेश्वर बुधवंत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

**सिंदखेडराजा । प्रतिनिधी**

वंजारी महासंघाचे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दिनांक २५ ऑगस्ट रोजी गंगा लान्स राष्ट्रसंत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहमदनगर येथे उत्साहात साजरे होणार आहे. या संमेलनासाठी संमेलन अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. सांगिता घुगे या लाभल्या असुन उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप हे लाभले आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्ती पटू राजकुमार आघाव तर सह स्वागताध्यक्ष रेणुका वराडे असुन अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. या संमेलनात दैनिक लोकनेताचे संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण २०२४ हा पुरस्कार जाहीर !

गेल्या काही वर्षांपासून दैनिक लोकनेता तसेच विश्व फाउंडेशनच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात समाज प्रबोधन व समाजसेवा करणारा जनसेवक म्हणून ज्ञानेश्वर बुधवत हे नाव महाराष्ट्राला परिचित झालं आहे. छोट्याशा वयामध्येच यशस्वी तसेच विचारवंत लोकांचा सहवास लाभल्याने पत्रकारितेबरोबर समाजसेवेचे वेड लागले व तेंव्हाच फार कठीण परिस्थितीत दैनिक लोकनेता सारखं छोटंसं विचारपीठ सुरु करून अल्प वेळात महाराष्ट्र भर भरारी लोकनेताने घेतली. पण यामागे ज्ञानेश्वर बुधवत नावाचं शांत व संयमी वादळ होतं.



याच धडाडीच्या कामाची दखल घेऊन वंजारी महासंघ महाराष्ट्र यांच्या मार्फत ‘ राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण २०२४ ‘ हा पुरस्कार दैनिक लोकनेताचे संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना नुकताच जाहीर झाला असून पुरस्काराचे वितरणदिनांक २५ ऑगस्ट रोजी गंगा लान्स, राष्ट्रसंत भगवानबाबा चौक, निर्मल नगर, अहमदनगर येथे होणार आहे. यामुळे ज्ञानेश्वर बुधवत यांचेवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077